# ग्रंथालय

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर ग्रंथालय विभागाद्वारे मी सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच ग्रंथालय सभासदांचे मनःपूर्वक स्वागत करतो. महाविद्यालयाचा आत्मा म्हणून ग्रंथालयास संबोधले जाते. आमच्या ग्रंथालया मध्ये पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके असा समृद्ध साठा उपलब्ध आहे. जवळजवळ 11 हजार एवढी ग्रंथसंपदा उपलब्ध आहे . त्याच प्रमाणे आजच्या आधुनिक युगामध्ये ग्रंथालयीन वाचकासाठी **N-list** सॉफ्टवेअर तर्फे 1,99,000+ ई-बुक्स व 6000+ e –journals ई-जर्नल उपलब्ध आहेत . ग्रंथालयात पुस्तकाची देवाण–घेवाण करण्यासाठी ई- ग्रंथालय या संगणक प्रणालीचा उपयोग केला जातो . तसेच ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची माहिती शोधण्यासाठी वाचन कक्षा मध्ये OPAC (Online Public Access Catalogue) ची सुविधा देखील उपलब्ध आहे. त्यामुळे वाचकांना घरी बसुन ग्रंथाचा शोध घेणे सोयीचे झाले आहे. ग्रंथालयाच्या प्रमुख विभागा पैकी अतिशय महत्वाचा विभाग म्हणजे पुस्तक देवाणघेवाण विभाग आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी निगडीत पाठ्यपुस्तके आठ दिवसांसाठी दिली जातात. परंतु त्यासाठी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचे सभासद होणे अनिवार्य आहे. ग्रंथालयाचे सभासद होण्यासाठी सभासद फोर्म भरून द्यावा लागेल. विशेष म्हणजे आमच्या येथे ओपन ॲक्सेस लायब्ररी आहे. दुसरा महत्वाचा विभाग म्हणजे ग्रंथदालन विभाग ज्यामध्ये ग्रंथालयातील पुस्तकेहि विषयानुसार ठेवलेली आहेत. विद्यार्थ्यांनी या विभागात प्रवेश करतांना ग्रंथालयातील कर्मचार्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे तसेच ग्रंथ दालनात प्रवेशकरतांना स्वतः जवळील सामान बाहेर ठेवावे.ग्रंथदालनात संदर्भ विभाग तसेच यु.जी.सी. च्या उपक्रमा अंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी उपयुक्त असणारी पुस्तके सदरील विभागात विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. तसेच विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष देखील आहे. स्पर्धा परीक्षेचे जवळपास 3,000 संदर्भ ग्रंथ, पुस्तके आमच्याकडे उपलब्ध आहेत.

सिद्धिविनायक ट्रस्ट मुंबई यांच्याकडून आम्हाला 2100 पुस्तके डोनेट दिली आहे. त्याच प्रमाणे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वाढदिवसाच्या ग्रंथालयास पाच ग्रंथ प्रत्येक कर्मचारी देतो ही विशेष बाब.

**ग्रंथपाल**
**बोंबले राजू बालासाहेब**
**हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर**